**<u>प्रतिवादी क्र.१ ते ६ तर्फे विद्वान विधिज्ञ श्री.डी.आर.पाटील यांच्या वतीने उलटतपास सुरु</u>–**

०१. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत दावा मी वादी क्र.१ ते ७ सर्वांच्या वतीने दाखल करुन आज त्याप्रमाणे सर्वांच्या वतीने साक्ष देत आहे. वादी क्र.२ ते ७ हे माझे सहधारक आहेत. सदर वादी क्र.२ ते ७ यांच्या वतीने मी यापुर्वी इतर मिळकत खरेदी केली नाही. दावा मिळकतीचे सर्व कागदपत्रे मी सदर मिळकत खरेदी करण्यापुर्वी पाहिली होती. मी दावा मिळकत खरेदी करण्यापुर्वी माहितगार विधिज्ञ यांच्यामार्फत आवश्यक तो शोध अहवाल प्राप्त केला नव्हता. तसेच, दावा मिळकत खरेदी करण्यापुर्वी वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रसिध्द केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचा खरेदीपुर्वी शोध अहवाल प्राप्त करण्यास तसेच, वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यास मला काही अडचण नव्हती.

०२. हे म्हणणे खरे आहे की, मी राजकीय क्षेत्रात काम करीत असून गेली काही वर्षे ग्रामपंचायत मुंढे येथे सरपंच होतो. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र.०५ भास्कर हे वारुंजी ग्रामपंचायत येथे सदस्य् होते. हे म्हणणे खरे नाही की, मी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये सहभाग घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी अनेक सहधारकांच्या नावाच्या नोंदी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत शेतजमिन पध्दतीची आहे. हे म्हणणे खरे आहे की, मौजे मुंढे व मौजे वारुंजी ही गावे एकमेकांजवळ असल्यामुळे दावा मिळकतीची मला पुर्वीपासून माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला प्रतिवादी क्र.१ याची माहिती होती. हे म्हणणे खरे नाही की, मला प्रतिवादी क्र.२ ते ६ यांची देखील पुर्वीपासून माहिती होती. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.०८ वरील दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकावर प्रतिवादी क्र.१ ते ६ यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील इतर व्यक्तींची देखील नावे आहेत. प्रतिवादी क्र.०१ याच्याकडून विवादित मिळकतीसंदर्भात व्यवहार करण्यापुर्वी त्याच्या कुटुंबामध्ये किती सदस्य आहेत व त्यांचे हिस्से किती आहेत व त्या सदंर्भात काही वाद सुरु आहे का, याबाबत मी माहिती घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीस लागून दक्षिण बाजूस चिपळूण ते कराड हा महामार्ग आहे. दावा मिळकतीसंदर्भात व्यवहार करण्यापुर्वी मी संबंधित मिळकतीचे शासकीय कार्यालयामधील नकाशे पाहिले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सदर चिपळूण ते कराड महामार्गाकरिता दावा मिळकतीमधील ६७ गुंठे क्षेत्रफळ हस्तांतरीत झाले आहे. साक्षीदार सांगतो की, त्याने व्यवहार करण्यापुर्वी तसे झाले आहे. आता मला नि.क्र.१०३ वरील साठेखताची मूळ प्रत दाखविली. त्याचे पान क्र.०७ वर

दावा मिळकतीचे वर्णन बिनशेती पध्दतीचे नमूद केले आहे. दावा मिळकत अकृषक असलेबाबत संबंधित शासकीय कार्यालयामध्ये मी तपासणी केली नाही, तसेच अकृषक आदेश निशाणी क्र.१०३ सोबत जोडला नाही. प्रतिवादी क्र.१, त्याचे भाऊ व बहिणी यांच्यामध्ये नोंदणीकृत वाटप झाले अगर कसे याबाबत मी माहिती घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, कथीत व्यवहार करण्यापुर्वीपासून नि.दि.दावा क्र.४९८/१९९९ हा प्रतिवादींविरुध्द प्रलंबित होता व त्याची मला माहिती होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या दाव्यामध्ये सदर दावा मिळकत हस्तांतरणास तुर्तातुर्त ताकीद देण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१०३ वरील दस्तऐवजामध्ये महामार्गास हस्तांतरीत झालेली मिळकत क्षेत्र सोडून व्यवहार केल्याचे नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१०३ वरील दस्तऐवज महसुल पत्रकी नोंद करण्याकरिता संबंधित तलाठी यांच्याकडे अर्ज सादर केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यानुसार फेरफार नोंद क्र.२६५९ नोंदविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोंद मंडलाधिकारी यांनी रद्द केली. हे म्हणणे खरे आहे की, सद्य स्थीतीत दावा मिळकतीच्या महसुल पत्रकी माझ्या नावाची नोंद नाही.

०३. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.१०३ वरील दस्तऐवजामधील अटीनुसार ०६ महिन्यांची मुदत नमूद होती. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१०३ वरील कथीत साठेखत दि.२५/०४/२००१ रोजीचे असून त्यातील कालावधीनुसार दि.२५/१०/२००१ पर्यंत मी प्रतिवादीस खरेदीखत करुन देण्याबाबत लेखी नोटीस पाठविली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर ०६ महिन्याच्या कालावधीमध्ये आवश्यक ती नोटीस देण्यास मला काही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सन २००१ ते २००८ या कालावधीमध्ये मी प्रतिवादींना सदर कथीत कराराची पुर्तता करण्याबाबत नोटीस पाठविली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि.२०/१०/२००८ रोजी सर्वप्रथम मी प्रतिवादींना नोटीस पाठविली. सदर नोटीसीची स्थळप्रत नि.क्र.१४७ वर दाखल आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींनी सदर विवादित नोटीसला विहीत मुदतीत लेखी उत्तर दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी मी प्रतिवादींविरुध्द दावा दाखल केला नाही.

**प्रश्न** – नि.दि.दावा क्र.४९८/१९९९ हा सन २००५ मध्ये खारीज करण्यात आला?

**उत्तर** – प्रतिवादींनी आम्हांला त्याबाबत सांगितले नाही, आम्ही त्या दाव्याची कागदपत्रे काढून पाहिल्यावर समजले. सदर कागदपत्र नेमके कधी काढले ती तारीख मी सांगू शकत नाही.

हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१४७ वरील दि.२०/१०/२००८ रोजीच्या

नोटीसमध्ये सदर दाव्याचा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २००८ पासून पुढे दावा मिळकती संदर्भात कोणत्याही न्यायालयाचा प्रतिबंधात्क आदेश नव्हता. माझ्या शपथपत्रामध्ये प्रतिवादी क्र.१ हा कथीत आजारी असल्याबाबत उल्लेख आहे, तथापि, त्यास नेमका कोणता आजार होता, याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या संदर्भात मी काही एक वैद्यकिय कागदपत्रे हजर केली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ हा कधीही आजारी नव्हता, त्यामुळे त्यासंदर्भात कागदपत्रे दाखल केली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. १४७ वरील सन २००८ मधील नोटीस ते नि.क्र.१४९ वरील सन २०१३ मधील नोटीस या कालावधीदरम्यान मी प्रतिवादींना लेखी नोटीस दिली नाही.

**प्रश्न** – सदर कालावधीदरम्यान प्रतिवादींना लेखी नोटीस देण्यास काही अडचण नव्हती ?

**उत्तर** – प्रतिवादी आजारी असल्यामुळे नोटीस दिली नाही.

हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.०१ हा कथीत आजारी होता, हे दर्शविण्याकरिता माझ्या तोंडी पुराव्याशिवाय काही एक कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, विवादित साठेखत दस्तऐवजाची ७/१२ पत्रकी नोंद न झाल्यामुळे मी वारुंजी ग्रामपंचायत येथे मिळकत क्र.८८५ नुसार उता–यास सन २००९ मध्ये नोंद केली. हे म्हणणे खरे नाही की, सन २००९ मध्ये माझे सहकारी नामे भास्कर बाळकृष्ण पाटील म्हणजेच वादी क्र.०५ हे संबंधित वारुंजी ग्रामपंचायतीचे सदस्य होते. वादी क्र.०५ हे दि.२७/०८/२००५ ते दि.२६/०८/२०१० संबंधित वारुंजी ग्रामपंचायतीचे सदस्य होते, तसेच दि.०६/११/२००९ ते २६/०८/२०१० या कालावधीमध्ये संबंधित वारुंजी ग्रामपंचायतीचे सरपंच होते, हे मला निश्चित आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र.०५ याच्या पदाचा गैरवापर करुन नि.क्र.०९ वरील ग्रामपंचायत उतारा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.०९ वरील उतारा दावा मिळकत खुली असल्याचे नमूद करुन तयार करण्यात आला.

**प्रश्न** – दावा मिळकतीमध्ये नि.क्र.०९ वर नमूद केल्याप्रमाणे १५ x २० क्षेत्रफळाचे पत्र्याचे शेड नाही ?

**उत्तर** – सदर शेड प्रतिवादींनी मोडले आहे.

हे म्हणणे खरे आहे की, सद्यस्थीतीत दावा मिळकत खुली आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१०३ वर नमूद केल्याप्रमाणे मी प्रतिवादीस रक्कम दिल्याबाबत कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादींना कथीत मोबदला दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, कथीत साठेखताच्या आधारे दावा मिळकतीमध्ये माझा प्रत्यक्ष कब्जा नव्हता व

नाही. हे म्हणणे खरे नाही की, सध्या दावा मिळकतीच्या क्षेत्रफळावर घरांचे बांधकाम केलेले आहे. बाळासाो विष्णु तवर याने दावा मिळकतीचे क्षेत्रफळ विक्री केले आहे अगर कसे, याबाबत मला माहिती नाही. दावा मिळकती संदर्भात प्रतिवादी व त्यांच्या भावांमध्ये दिवाणी न्यायालय तसेच महसूल न्यायालयांमध्ये प्रकरणे प्रलंबित आहेत अगर कसे, याबाबत मला माहिती नाही. नि.क्र.१०३ वरील दस्तऐवजावर प्रतिवादींचे सावत्र भाऊ नामे बाळासो विष्णू तवर तसेच त्यांच्या बहिणींची संमती घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी राजकीय दबाव टाकून कथीत साठेखत करुन घेतले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत महामार्गलगत असल्यामुळे मौल्यवान आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र.२ ते ७ न्यायालयासमक्ष येवून पुरावा नोंदवू शकतात. हे म्हणणे खरे नाही की, दावामिळकतीच्या चतुःसिमा मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कथीत ०८ आर क्षेत्रफळाची लांबी रुंदी मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर वर्णनाची मिळकत प्रत्यक्षात अस्तित्वात नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावामिळकत महामार्गाच्या क्षेत्रफळांमध्ये हस्तांतरीत झालेली आहे. सन २०११ मध्ये प्रतिवादी क्र.०१ याने विष प्राशन केल्यामुळे त्याला श्री हॉस्पीटल, कराड येथे दाखल करुन त्याच्यवर उपचार केले अगर कसे, याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २००१ ते २०१३ या कालावधीमध्ये मला विवादित साठेखताच्या आधारे खरेदीपत्र करुन घेण्यास काही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे पुरावे दाखल केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतवादीस विवादित नि.क्र.१०३ वरील दस्तऐवज करुन देण्याचा अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, कथीत साठेखताच्या आधारे मला प्रस्तुत दाखल करण्याचा अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती.

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2025.10.30 12:49:17 +0530

(अ.अ. उत्पात)

दिनांक –३०/१०/२०२५.

५ वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कराड.